# मेट्रो ३ मार्गिकेचे एकूण ८१ टक्के काम पूर्ण



**। मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ प्रकल्पाच्या एकूण कामाचा अहवाल मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने जाहीर केला असून या अहवालानुसार, एकूण प्रकल्पाचे ८१ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम ८७ टक्के पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले आहे.

एमएमआरसीएलने दिलेल्या माहितीनुसार, एकूण कामापैकी ९२.७ टक्के सिव्हिल वर्क, स्थानकांचे बांधकाम ८९.७ टक्के, भुयारीकरणाचे १०० टक्के काम, एकूण कार्यप्रणालीचे ५०.५ टक्के, तर मुख्य मार्गिकेच्या ट्रॅकचे काम ६०.६ टक्के पूर्ण झाले आहे. आरे येथील कारशेडचे ६२ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलने दिली आहे. काही दिवसांपूर्वीच आरे येथील कारशेडमध्ये मेट्रोचे डबे दाखल होण्यापूर्वी वृक्ष छाटणीचे काम पोलीस बंदोबस्तात पूर्ण करण्यात आले होते. आरे येथील कारशेडमध्ये मेट्रो ३ च्या एकूण ३ ट्रेन दाखल झाल्या असून, ट्रॅक चाचणी आणि मेट्रो डब्यांची चाचणी सुरू आहे.

डिसेंबर २०२३ पर्यंत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्याचा एमएमआरसीएलचा मानस असून, त्यानुसार कामे विभागून नियोजनात्मक पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. स्थानकांचे काम अत्यंत वेगाने सुरू असल्याने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्याकडून विविध स्थानकांमध्ये प्रत्यक्ष भेटी देण्यात येत आहेत.

**पहिला टप्पा :** पूर्ण झालेले काम

**आरे ते बीकेसी :** ८७ टक्के

**प्रकल्पाचे कार्यचलनाचे काम :** ५७.९ टक्के

**संपूर्ण कार्यप्रणाली :** ६४.७ टक्के

**ट्रॅकचे काम :** ८५.२ टक्के

**भुयारी मेट्रो स्थानकांचे काम :** ९२.९ टक्के